# विद्याविकास प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी मधील मुलांची फुटबॉल स्पर्धेत चमकदार कामगिरी



डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय तंत्र शास्त्र व फार्मासी महाविद्यालयाच्या फुटबॉल स्पर्धेत मुलांच्या गटात V.V.P कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.

नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग आणि टेक्नॉलॉजी येथे या सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. DBATU अंतर्गत नांदेड, लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्हयातील विविध कॉलेज मधील संघ या खेळासाठी सहभागी झाले होते. V.V.P कॉलेजमधील विविध डिपार्टमेंट मध्ये विद्यार्थी या खेळात सहभागी झाले होते. GMC नांदेड सोबत झालेल्या सामन्यात ३-० तसेच तेरणा कॉलेज सोबत २-१ झालेल्या सामन्यात मुलांनी विजय मिळविला. तसेच या मुलांमधून २ विद्यार्थी पुढे झोनल स्पर्धा

साठी निवड झाली आहे. रोहित नंदीमेटला आणि शिवलिंग शिरूर हे दोघांची पुढे निवड करण्यात आली आहे.

मुलांच्या या कामगिरीमुळे कॉलेजमध्ये आनंदाचे वातावरण असून तिने खेळ व शिक्षण यांचा उत्कृष्ट समतोल साधत प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर अरुण गायकवाड यांनी तिचे कौतुक करताना म्हणाले की आपल्या कॉलेजमध्ये क्रीडा संस्कृती अधिकाधिक मजबुत व्हावी, हाच माझा मुख्य उद्देश आहे. शिक्षणाबरोबरच खेळ हेही व्यक्तिमत्त्व विकासाचे समान रूपाने महत्त्वाचे घटक आहेत. फुटबॉल खेळ आपल्याला टीमवर्क, शिस्त, एकाग्रता, आणि वेगवान निर्णयक्षमता शिकवतो.

या यशाबद्दल प्राचार्य व शिक्षण संकुल संचालक प्रा.डॉ.अरुण गायकवाड, तंत्रनिकेतन प्राचार्य डॉ.S.N.कुलकर्णी ,संगणक विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रीती देशमुख, सिव्हिल विभाग प्रमुख प्रा. अविनाश पाटील तसेच सर्व शिक्षक वृंदांनी मुलांचे अभिनंदन केले. क्रीडा प्रमुख प्रा. विवेक बामणे यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष अमोल (नाना) चव्हाण, संस्थापक चेअरमन प्रा. डॉ. जी. के. देशमुख, व्हाईस चेअरमन श्री. मधुकर कटकधोंड तसेच सचिव श्री.रोहित देशमुख यांनी मुलांचे कौतुक केले तसेच दोघांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.